**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी अर्ज करण्याची मुदत संपुष्टात, उद्या छाननी

- आरक्षणाची ५० टक्के कमाल मर्यादा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओलांडता येणार नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

- शासकीय सेवांच्या भर्ती परीक्षांचे निकाल लागल्यावर ४ दिवसात नियुक्तीपत्रं देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**आणि**

- राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कारासाठी यंदा राज्यातल्या दोन दुग्धोत्पादक शेतकऱ्यांची निवड

**<><><><><>**

राज्यात नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी अर्ज करण्याची मुदत आज संपुष्टात आली. उद्या, मंगळवारी अर्जांची छाननी होणार आहे. त्यानंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर केल्यानंतर १९ ते २१ नोव्हेंबर या दरम्यान ज्या प्रभाग किंवा अर्जावर अपिल आहे असे सोडून इतर ठिकाणी अर्ज मागे घेता येतील. २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची चिन्हांसह अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे. याविषयी अधिक माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**-----व्हीसी-----**

*(**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात कणकवली नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या संदेश पारकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने पाठिंबा दिला आहे. जिल्ह्यात नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आणि गोवा राज्याच्या पोलीस अधिकाऱ्यांची बॉर्डर परिषद झाली. निवडणूक काळात शांतता राखण्यासाठी योग्य ते नियोजन करण्याचा निर्णय यावेळी झाला.*

***धुळे*** *जिल्ह्यातल्या पिंपळनेर नगरपरिषदेसाठी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा आणि काँग्रेसच्या उमेदवारांनी आपापले उमेदवारी अर्ज भरले. याशिवाय शिरपूर, दोंडाईचा नगरपरिषद आणि शिंदखेडा नगरपंचायतीसाठीही विविध पक्षांच्या उमेदवरांनी उमेदवार अर्ज दाखल केले.*

***पालघर*** *नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी भाजपाकडून कैलास म्हात्रे, काँग्रेसकडून प्रतिम राऊत, शिवसेनेकडून उत्तम घरत आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उत्तम पिंपळे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.*

***भंडारा*** *जिल्ह्यात सर्व राजकीय पक्ष स्वबळावर निवडणूक लढत आहेत. आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने सर्व पक्षांनी शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले. शक्य तिथे काँग्रेस इतर पक्षांसोबत युती करेल, अन्यथा स्वबळावर लढेल, मात्र महाविकास आघाडीचेच सदस्य जास्तीत जास्त निवडून येतील असा विश्वास काँग्रेस नेते नाना पटोले यांनी आज वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केला. तर भंडारा जिल्ह्यातल्या चारही नगरपरिषदांच्या अध्यक्षपदी शिवसेनेचे उमेदवार निवडून येतील असं आमदार नरेंद्र भोंडेकर म्हणाले.*

***गोंदिया*** *जिल्ह्यातही सर्व पक्षांनी स्वबळाचा नारा दिला आहे. आज भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.*

***पंढरपूर*** *नगरपरिषद निवडणूकीतून काँग्रेसने आज माघार घेतली. काँग्रेसने तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रणिता भालके यांना पाठिंबा दिल्याचं खासदार प्रणिती शिंदे यांनी आज जाहीर केलं.***धाराशिव** नगरपालिकेसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने काँग्रेससोबत आघाडी केली आहे. नगराध्यक्षपदासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या संगीता गुरव यांनी अर्ज भरला. *)*

**<><><><><>**

एकंदर आरक्षणावर असलेली ५० टक्क्यांची कमाल मर्यादा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये पाळावीच लागेल, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं आज दिला. बांठिया आयोगाच्या निष्कर्षांच्या आधारे या निवडणुकीत ओबीसी आरक्षण लागू करायच्या सरकारच्या निर्णयासंबंधीच्या याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

## ***व्हाइस कास्ट***

*(निवडणुकीची प्रक्रिया थांबवण्याचा न्यायालयाचा उद्देश नाही, मात्र आरक्षणाची कमाल मर्यादा ओलांडली जाता कामा नये, असं न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी आजच्या सुनावणीत स्पष्ट केलं. या निवडणुकांमध्ये इतर मागासवर्गीय प्रवर्गाला आरक्षण देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्देशांचा चुकीचा अर्थ लावण्यात आला आहे, असं मत पीठानं नोंदवलं. महाधिवक्ता तुषार मेहता यांनी वेळ वाढवून द्यायची विनंती केली, मात्र तोपर्यंत निवडणूक अर्ज दाखल करायची प्रक्रिया संपलेली असेल, याकडे न्यायमूर्ती कांत यांनी लक्ष वेधलं. त्यावर, या काळात जे काही होईल, ते न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर अवलंबून राहील, अशी हमी मेहता यांनी दिली. या प्रकरणाची पुढची सुनावणी बुधवारी रोजी होणार आहे.)*

**<><><><><>**

निकृष्ट आणि अनधिकृत बियाण्यांच्या विक्रीवर नियंत्रण आणण्यासाठी संसदेच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवीन बी बियाणे विधेयक आणणार असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज सांगितलं. ते आज मुंबईत आशियाई बी बियाणे परिषद-2025 च्या उद्घाटन समारंभात बोलत होते. बीज उद्योग हा केवळ नफ्याचा नव्हे, तर देश आणि जगाच्या अन्नसुरक्षेचा आधार आहे. त्यामुळे शासन आणि खासगी क्षेत्रानं एकत्र येऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस कृती करावी, असं ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीसही यावेळी उपस्थित होते. हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका कृषी क्षेत्राला सहन करावा लागतो. त्यामुळे होणारं नुकसान टाळण्यासाठी शाश्वत कृषी पद्धतींचा अवलंब आवश्यक आहे, असं ते म्हणाले. या कामात भारताकडे असलेलं पारंपरिक बीज साठवणूक पद्धतीचं ज्ञान उपयोगी पडेल, असंही त्यांनी सांगितलं…

**- - होल्ड- बाईट- मुख्यमंत्री - -**

**<><><><><>**

शासकीय सेवांमध्ये विविध पदांच्या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर किमान चार दिवसात संबंधित उत्तीर्ण उमेदवाराला नियुक्तीपत्र द्यावं, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिले. वर्षा निवासस्थानी सुशासनासाठी प्रशासकीय सुधारणांबाबत आयोजित सादरीकरण बैठकीत ते बोलत होते. दरवर्षीचा आढावा घेत जानेवारी महिना संपेपर्यंत उपलब्ध पदोन्नतींच्या जागांनुसार ७५ टक्के पदोन्नती देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

नागरिक केंद्रित, जबाबदार आणि सुशासनासाठी मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय सुधारणा केल्या जात आहे. या सुधारणांमध्ये प्रत्येक विभागानं सक्रिय सहभाग नोंदवत आपला ठसा उमटवावा, असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागातर्फे दिला जाणारा राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कार यंदा राज्यातल्या दोन दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी पटकावला आहे. देशी दुभत्या पशुंचे संगोपन करणाऱ्या सर्वोत्कृष्ट दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या श्रेणीत कोल्हापूरच्या अरविंद यशवंत पाटील आणि श्रद्धा ढवन यांनी पुरस्कार पटकावले आहेत. अरविंद पाटील यांनी पहिला क्रमांक मिळवला असून श्रद्धा ढवन यांना तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. याखेरीज दूध उत्पादक संस्था, कृत्रिम रेतन तंत्रज्ञ या श्रेणींमध्येही पुरस्कार विजेत्यांची घोषणा झाली आहे.

**<><><><><>**

शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी मुंबईत दादर इथल्या त्यांच्या स्मृतीस्थळावर दिवसभर मोठी गर्दी पाहायला मिळाली. सकाळपासून राज्यभरातून कार्यकर्ते मोठ्या संख्येनं मुंबईत येत होते. यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे तब्बल ११ वर्षांनंतर एकाच वेळी या स्मृतीस्थळावर दिसले.

**<><><><><>**

पालघरमध्ये काशिनाथ चौधरी यांच्या भाजप पक्षप्रवेशाला प्रदेश कार्यालयाकडून स्थगिती देण्यात आली आहे. २०२०मध्ये कोरोना काळात पालघर इथे झालेल्या साधुंच्या हत्येप्रकरणी काशिनाथ चौधरी यांच्यावर भाजपने गंभीर आरोप केले होते. मात्र, आता त्यांनाच पक्षात प्रवेश दिल्यामुळे झालेल्या टीकेनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**<><><><><>**

महानगर गॅसच्या पाईपलाईनमधे तांत्रिक बिघाड झाल्याने मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे इथला सीएनजी पुरवठा ठप्प झाला आहे. याचा परिणाम रिक्षा, टॅक्सी, आणि शहर परिवहनच्या बसगाड्यांवर झाला आहे. औद्योगिक आणि व्यावसायिक

ग्राहकांना पर्यायी इंधन वापरण्याचा सल्ला महानगर गॅस लिमिटेडने दिला आहे. तसंच तांत्रिक बिघाड झाला असला तरी घरगुती गॅस ग्राहकांना विनाअडथळा पुरवठा केला जाईल, असं महानगर गॅस लिमिटेडने स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या शिक्षणव्यवस्थेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी केवळ योजना तयार करणं पुरेसं नसून त्यांची व्यवहार्य अंमलबजावणी झाली पाहिजे, असं मत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी व्यक्त केलं. ते आज राजभवनात आयोजित राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि व्हिजन महाराष्ट्र २०४७’ या विषयावरच्या कार्यशाळेत बोलत होते.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात थंडीची लाट कायम असून, आज नाशिक शहरात ९ पूर्णांक ६ दशांश, तर निफाडला ८ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

गेल्या २४ तासात विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली, मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी, तर कोकणात काही ठिकाणी किंचित घट झाली. येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**